## सोपेकॉम, मकाम आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था आयोजित एकदिवसीय चर्चासत्र

# ‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’

### दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ ‘प्रेरणा सभागृह’ पोलीस मुख्यालय, यवतमाळ

‘शेती क्षेत्रातील महिलांवर होणारा हिंसाचार’ हे एक दिवसाचे चर्चासत्र सोपेकॉम (पुणे), महिला किसान अधिकार मंच (मकाम), आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीस) ह्यांनी यवतमाळ मध्ये प्रेरणा सभागृह, पोलीस मुख्यालया इथे दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित केले होते. चर्चासत्रासाठी शेतकरी महिला आणि इतर संस्था संघटनेचे मिळून एकूण १२० सदस्य उपस्थित होते.




चर्चासत्राच्या उद्घाटनाला जिल्हा पोलीस अधीक्षक, मा. डॉ. पवन बन्सोड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चे सचिव मा. न्या. श्री कुणाल नाहर, आणि जिल्हा परिषद, महिला आणि बाल विकास अधिकारी मा. श्री प्रशांत थोरात, उपस्थित होते. मान्यवरांनी रोपाला पाणी घालून आणि सोपेकॉम ने केलेल्या अभ्यासातील यवतमाळ जिल्हाच्या अहवालाचे प्रकाशन करून चर्चासत्राचे उद्घाटन केले.

उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक सोपेकॉमच्या सीमा कुलकर्णी आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या विशेष कक्षाच्या विदर्भ समन्वयक श्रीमती प्रतिभा गजभिये यांनी केले. सर्व पाहुण्यांचे स्वागत मकामच्या यवतमाळ जिल्ह्याच्या प्रतिनिधी व प्रेरणा ग्राम विकास संस्थेच्या सदस्य माधुरी खडसे यांनी केले. सत्राच्या सुरुवातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला प्रतिनिधी श्रीमती. वैशाली देवतळे ह्यांनी त्यांना शेतकरी म्हणून काम करत असताना येत असलेल्या हिंसेचे अनुभव आणि प्रश्न अधिकाऱ्यांसमोर उपस्थित केले.



डॉ. पवन बन्सोड यांनी चर्चासत्राच्या विषयाच्या अनुषंगाने मांडणी करताना त्यांनी हाताळलेल्या महिला हिंसाचाराच्या संदर्भातील विविध प्रकारच्या केसेस चा दाखला देत सांगितले की महिला ह्या हिंसा सहन करीत असतात, आणि त्यांनी हिंसा सहन करावी, त्यांनी सहनशील असावे, विरोध करू नये असे त्यांना शिकवले जाते, जे आपण बदलले पाहिजे. महिलांनी हिंसेचा विरोध करायला पाहिजे. तसेच महिलांच्या शेतीक्षेत्रातील हक्कासाठी आणि त्यासंदर्भातील प्रश्नांवर चर्चा होणे गरजेचे आहे. झालेला अभ्यास आणि चर्चासत्र त्या अनुषंगाने नक्कीच महत्वाचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



मा. न्या. श्री कुणाल नाहर (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ) विधी सेवांची गरज असणाऱ्या महिलांना ती पुरवण्याची तयारी दाखवली. कायद्यामध्ये तशा तरतुदी आहेत. तसेच ‘चला-बोलूया’ सारखे समुपदेशन केंद्र सुद्धा कार्यरत आहे. त्यासोबतच विधीसेवा मिळवण्यासाठी १५१०० हा टोलफ्री नंबर आहे, जेथे महिला, वकिलांचा सल्ला मोफत मिळवू शकतात. त्यासाठी लीगल एड क्लिनिक जिल्ह्याच्या ठिकाणी रोज कार्यरत आहे, तर तालुक्याच्या ठिकाणी ठराविक दिवशी कार्यरत असते, ज्यामध्ये मोफत सल्ला आणि प्राथमिक मदत दिले जाते.

पती-पत्नीमधील वाद सोडवण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण 'लोक अदालत' च्या माध्यमातून मध्यस्थीची भूमिका घेऊन वाद सोडवण्यासाठी कार्य करते. महाराष्ट्र शासनाकडून मनोधैर्य ही योजना राबवली जाते ज्यामध्ये बलात्कार पिडीत महिलेचे पुनर्वसन करण्यासाठी ३ लाखापर्यंत आर्थिक मदत केली जाते. यासारखी महत्वाची माहिती नाहर यांनी महिलांना दिली.

सत्राचे पुढील वक्ते मा. प्रशांत थोरात (जिल्हा परिषद, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, अकोला) म्हणाले की महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग फारच कमी आहे. त्यासाठी महिलांमध्ये आर्थिक साक्षरता, व्यवहार ज्ञान वाढवण्याची गरज आहे. आणि कोणत्याही हिंसेचा सामना करावा लागत असल्यास यंत्रणे पर्यंत न घाबरता पोहोचावे.

सत्राच्या शेवटच्या वक्त्या श्रीमती. सुजाता बन्सोड (सहाय्यक पोलीस निरीक्षक, भरोसा सेल यवतमाळ) यांनी विचार मांडताना त्यांचे मत व्यक्त केले की, मुलगा-मुलगी असा भेद हा घरापासूनच सुरु होतो. तसे न करता मुले आणि मुलींना समान वागणूक द्यायला पाहिजे. शेतकरी महिलांना उद्देशून बोलताना म्हणाल्या की, महिलांना त्यांचे हक्क मिळवायचे असल्यास त्यांनी सामाजिक संस्थांना सहकार्य केले पाहिजे. महिलावर घरगुती हिंसाचार होत असल्यास ११२, १८१ टोल फ्री नंबर वर फोन करावा असे त्यांनी सांगितले. आयोजित चर्चासत्रासारखे कार्यक्रम ग्रामपंचायत पातळीवर देखील घ्यावेत असे त्यांनी सुचवले. सत्राचा शेवट मकाम च्या प्रतिनिधी श्रीमती. माधुरीताई खडसे यांनी मान्यवरांचे आभार करीत केले.

**सत्र दुसरे : महिलांवर होणारा हिंसाचार-सध्या जिल्ह्यात काय परिस्थिती दिसते आहे?**




सोपेकॉम आणि मकाम ह्यांनी 'शेती मधील अरिष्ट आणि महिलांवर होणारा हिंसाचार' ह्या विषयावर केलेल्या अभ्यासातून समोर आलेल्या निष्कर्षांची मांडणी सोपेकॉमच्या स्नेहा भट ह्यांनी केली. त्यांनी त्यांच्या मांडणीमध्ये राळेगाव आणि कळंब तालुक्यात ५०७ महिलांसोबत करण्यात आलेल्या अभ्यासातील महत्वाचे मुद्दे समोर ठेवले. अभ्यास केलेल्या बहुतेक सर्व महिला ह्या भूमिहीन किंवा सीमांत आणि छोट्या शेतकरी होत्या. ७३ % महिला उपजीविकेसाठी मजुरीवर अवलंबून होत्या. पिकाची एकसुरी पद्धत, हवामान बदलामुळे शेतीवर होणारे परिणाम, कामाची अनुपलब्धता, बिनमोलाच्या कामाचे वाढलेले ओझे, वाढता कर्जबाजारीपणा, अन्न आणि पोषण असुरक्षितता, आरोग्यावर होणारे परिणाम ह्या सर्व गोष्टी अभ्यासात अधोरेखित झाल्या. त्याचबरोबर अभ्यासातून एकट्या महिला, संसाधनहीन जाती-जमातींमधील असल्याने त्यांना येणारे हिंसाचाराचे अनुभव अधिकच गंभीर असतात, यावर विचार मांडले. २५% महिलांनी त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे हिंसाचाराचा सामना करणाऱ्या महिलांपैकी केवळ ३ महिलांनी पोलीस स्टेशन मध्ये जाऊन मदत मागितली. पुढे सोपेकॉम च्या ऋचा वसुमती सतीश ह्यांनी 'कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा आणि कायद्याबद्दल' पोस्टरमध्ये दर्शवलेल्या माहितीचे वाचन केले.

त्यानंतर सत्रांमध्ये महिला व मुलांसाठी विशेष कक्षाच्या प्रतिनिधी श्रद्धा चौधरी, करुणा मेश्राम आणि श्रीकांत निवल ह्यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या केसेसच्या आधारे महिलांवर कश्या प्रकारचे हिंसाचार होतात त्याची मांडणी केली. त्यांच्याकडे महिला ज्या केसेस घेऊन येतात त्या आधारे जिल्ह्यातील महिलांचे काय अनुभव आहेत तसेच शारीरिक, आर्थिक, मानसिक आणि लैंगिक हिंसाचाराच्या व्याख्यांच्या आधारे त्यांनी हाताळलेल्या केसेस चे वर्गीकरण करून आकडेवारी प्रस्तुत केली व महिलांना उद्देशून सांगितले की अत्याचार सहन करण्यापेक्षा यंत्रणेची मदत घ्यावी आणि स्वतःची सुरक्षा करावी.

सोपेकॉम आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या प्रतिनिधींकडून झालेल्या मांडणीवर चर्चा करण्यासाठी चर्चक म्हणून सावित्री-ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. श्री. घनश्याम दरणे उपस्थित होते. त्यांनी झालेल्या मांडणीवर चर्चा करताना काही महत्वाच्या सूचना दिल्या. ते म्हणाले की, गावात महिला हिंसाचाराच्या विरोधात हस्तक्षेप करू शकतील असे गट गावपातळीवर तयार व्हायला हवेत. आणि गावपातळीवर सक्षमीकरण आणि लिंगभाव संवेदनशीलतेवर कार्यक्रम घेतले पाहिजेत. शेतजमिनीवरील अधिकाराच्या मुद्द्यावर बोलताना ते म्हणाले की महिलांनी जागरूक असण्याची अत्यंत गरज आहे कारण महिलांवरील हिंसा ही विशिष्ट वयाच्या महिलेपुर्ती किंवा एखाद्या विशिष्ट कारणापुरती सीमित नाही तर महिला ही विविध कारणांमुळे पितृसत्तेची बळी पडत असते. म्हणून हिंसेला समजून घेताना सामाजिक-सांस्कृतिक संरचनेच्या अनुषंगाने आकलन केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.



या सत्रामध्ये महिला सहभागीनीही प्रतिक्रिया दिल्या. महिला प्रतिनिधी वैशाली देवतळे यांच्या मते स्थानिक-गावपातळीवर तक्रार केंद्र/समिती असावी की ज्यामुळे महिलांना ते सोयीस्कर होईल, तसेच सरकारी अधिकाऱ्यांनी योग्यरीत्या महिलांना सहकार्य आणि मार्गदर्शन करावे जेणेकरून महिलांना न्याय मिळेल.

**सत्र तिसरे: घरगुती व कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा: सध्य परिस्थिती**

या सत्रामध्ये श्रीमती. रुपाली पांडे (जिल्हा संरक्षण अधिकारी,यवतमाळ), महिला प्रतिनिधी श्रीमती. नीलिमा रेंगे, आणि शीतल कोळवते, सखी वन स्टॉप केंद्राच्या केंद्र प्रशासक श्रीमती मीनल जगताप, तसेच पोलीस पाटील संघटनेचे जिल्हा अध्यक्ष श्री. रुपेश सावळकर उपस्थित होते. या सत्राचे सत्र नियंत्रण विशेष-कक्षाच्या सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा चौधरी यांनी केले.




महिलांवरील शेती क्षेत्रातील हिंसा ही कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा आहे या दृष्टीने नक्कीच स्वीकारले पाहिजे आणि त्या दृष्टीने गावपातळीवरील यंत्रणेने (प्रामुख्याने पोलीस पाटील) महिला शेतकऱ्यांना सहकार्य केले पाहिजे असे मत व्यक्त श्री. रुपेश सावळकर यांनी केले. त्यांनी आश्वासन दिले की पोलीस पाटील संघटनेच्या वतीने ते पोलीस-पाटलांना याबद्दल नक्कीच संवेदनशील करतील. श्रीमती. नीलिमा रेंगे आणि श्रीमती. शीतल कोळवते यांनी घरगुती हिंसाचाराचे त्यांचे अनुभव सर्वांसमोर मांडले. त्यांच्या अनुभवातून संपत्तीवर अधिकार, अधिकारासोबत संपत्तीवर नियंत्रण, संपत्ती संदर्भातील निर्णय आणि समान सहभाग ह्या सर्व बाबी महिला सुरक्षिततेच्या अनुषंगाने समान महत्वाच्या आहेत हे लक्षात आले.

श्रीमती मीनल जगताप ह्यांनी महिलांवर होणारी हिंसा तिच्या वयावर अवलंबून नाही. ती पितृसत्तेची विकृत मानसिकता आहे ह्याबद्दल मांडणी केली. महिलांनी इतर महिलांबद्दल वाईट बोलने, कुजबुजणे, चारित्र्यावर शंका ठेवणे थांबवले पाहिजे. तसेच महिलांनी इतर महिलांना सहकार्य करावे जेणेकरून अत्याचाराचे किंवा हिंसेचे ओझे न घेता महिलांना जगता येईल. त्यासोबतच सखी केंद्राच्या कार्यप्रणाली आणि सेवांची त्यांनी माहिती दिली. त्यानंतर, श्रीमती. रुपाली पांडे यांनी कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५ अंतर्गत असलेल्या कौटुंबिक हिंसाचाराची

व्याख्या आणि कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा कायदा २०१३ मध्ये समाविष्ट हिंसेची व्याख्या आणि व्याप्ती याबद्दल महिलांना स्पष्टता दिली. तसेच त्यासंबंधित महिलांच्या मदतीसाठी असलेल्या यंत्रणेची सुद्धा ओळख करून दिली.

**सत्र चौथे : पुढील दिशा**

या सत्रामध्ये धरामित्र संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या श्रीमती सुचिता इंगोले, रसिकाश्रय संस्थेचे श्री. नितीन पवार व सृजन संस्थेच्या योगिनी डोळके वक्ते म्हणून उपस्थित होते. तसेच शेतकरी महिला प्रतिनिधी ज्योत्स्ना उईके आणि संत्र नियंत्रक म्हणून सीमा कुलकर्णी होत्या.



ज्योत्स्ना उईके यांनी त्यांचे एकल महिला म्हणून झालेल्या हिंसेचे अनुभव सांगितले आणि महिलांना उद्देशून म्हणाल्या की शेतीवरील अधिकार मिळवण्यासाठी जर महिलांना काही अडचण येत असेल तर त्या महिलांना मदत करतील. महिलांसोबत गरज पडेल त्या ठिकाणी जाण्याची तयारी त्यांनी दाखवली. पुढे बोलताना त्यांनी काही मागण्या ठेवल्या, जसे की महिलांकरिता स्थानिक तक्रार केंद्र असले पाहिजे. महिलांकरिता हिंसाचार प्रतिबंधात्मक समित्या असल्या पाहिजे. त्यामध्ये महिलांचे प्रतिनिधीत्व असले पाहिजे. तसेच महिलांना, कृषी केंद्रांमध्ये माल खरेदी-विक्रीकरीता परवाना मिळायला पाहिजे.

श्रीमती सुचिता इंगोले (धरामित्र) त्यांचे विचार मांडताना म्हणाल्या की महिलांचा शेतीशी खूप घनिष्ट आणि ऐतिहासिक संबंध आहे. प्रत्येक शेतकरी महिलेचे हिंसेचे अनुभव प्रत्यक्षात आपल्याला समजेलच असे नाही पण त्यांच्या संघर्षात नक्कीच मदत करता येईल. शासनापर्यंत त्यांचे प्रश्न पोहोचवता येईल. पुढील दिशा काय असायला हवी याबद्दल बोलतांना त्या म्हणाल्या ७/१२ वर महिला शेतकऱ्यांचे नाव लागणे हि पुढची दिशा असली पाहिजे. महिला खरेदी-विक्री केंद्रावर मुक्तपणे जाऊ शकतील आणि स्वतःची ओळख त्या मिळवू शकतील या दृष्टीने सामाजिक संस्थांनी काम करण्याची गरज आहे. जिल्ह्यामध्ये जे कृषी मेळावे होतात त्यामध्ये महिलांनी माल विक्रीसाठी आणायला हवा. महिलांची आर्थिक बाजू अधिक बळकट कशी होईल या दृष्टीने पुढील दिशा ठरवायला पाहिजे. शेतीसोबत जोड-उद्योग प्रत्येक शेतकरी महिलेनी करायला पाहिजे. बदलत्या पर्यावरणासोबत समायोजन करण्यासाठी आणि आर्थिक बळकटीकरण करण्यासाठी महिलांनी गटाने काही कामे करता येईल का, या दृष्टीने विचार करायला पाहिजे. तसेच रोजगाराच्या वाटा खुल्या करण्यासाठी सेंद्रिय शेती करायला पाहिजे, असेही त्यांनी महिलांना सुचवले.

त्यानंतर, रसिकाश्रय चे नितीन पवार यांनी पुढील दिशेवर विचार मांडताना सांगितले की पर्यावरण बदलाचा वाईट परिणाम शेती व्यवसायात होत असल्याने संकट वाढलेले आहेत. शेतजमीन महिलांच्या नावे झालीच पाहिजे, आणि त्याचे प्रमाण वाढले पाहिजे. मायक्रो फायनान्स सारख्या खाजगी बँक/कंपन्या जे अतिरिक्त कर घेतात त्यासाठी काही सक्तीचे नियम बनवण्या संदर्भात सरकारकडे निवेदन देण्याचे कार्य करणे महत्वाचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे, ते म्हणाले की अस्तित्वात असलेल्या समित्या कश्या कृतीशील बनवता येईल यावर विचार केला गेला पाहिजे. सत्राचे समारोपीय वक्तव्य योगिनी डोळके यांनी केले. त्यांनी सोपेकॉम आणि



मकाम ने केलेल्या अभ्यासाबद्दल शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी दिवसभर झालेल्या चर्चेचा आढावा घेत महिलांना सुचवले की महिलांवर होणाऱ्या हिंसेवर न घाबरता बोलले पाहिजे. महिला जिथे कुठे जातात त्या प्रत्येक ठिकाणी त्यांनी झालेल्या हिंसेबद्दल वाचा फोडायला पाहिजे. चर्चासत्राच्या शेवटी सत्राच्या सत्र नियंत्रक यांनी काही ठराव महिलांसमोर ठेवले आणि त्यावर महिलांची संमती आहे की नाही यासंदर्भात विचारणा केली.

खालील मुद्यांवर शेतकरी महिलांनी संमती दर्शवली:

1. गावातील महिला सुरक्षित राहील ह्यासाठी गावपातळीवर यंत्रणा असायला पाहिजे.
2. महिला शेती करतात, मेहनत करतात तर त्यांना जमिनीवर अधिकार मिळायला पाहिजे.
3. भूमिहीन शेतकरी महिलांना पुरेसे काम मिळाले पाहिजे, या दृष्टीने शासनाकडे मागण्या आणि निवेदन द्यायला पाहिजे.
4. महिला निर्णय प्रक्रियेमध्ये, खरेदी-विक्रीच्या व्यवहारामध्ये अग्रेसर असल्या पाहिजेत, त्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यायला पाहिजे.
5. अतिरिक्त कर वसूल करणाऱ्या सावकारी, बेसिक, मायक्रो फायनान्स ला बंद करायला पाहिजे.
6. पुरुष-आणि महिलांना समान मजुरी दिली गेली पाहिजे, तसेच सगळ्या आर्थिक संसाधनांवर समान अधिकार महिलांना मिळाले पाहिजे.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपेकॉमच्या वनिता तुमसरे ने केले आणि शेवटी सोपेकॉम च्या स्नेहा भट ह्यांनी आभार मानले.